**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८३/२०१९** **दिनांक १५/१०/२०१९** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके**,
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे**,
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव**,
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०९/१०/२०१९ ते १५/१०/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १६/१०/२०१९ सकाळी ८:३० पासून २०/१०/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९/१० | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | १४/१० | १५/१० | | १६/१० | १७/१० | १८/१० | १९/१० | २०/१० |
| ३.० | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | १७ | २५ |
| ३९.२ | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३६ | ३५ | ३५ | ३४ | ३३ |
| २३.४ | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २५ | २६ | २६ | २५ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ७ | ४ | ८ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६६ | ६९ | ७१ | ८५ | ८९ |
| ८० | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४४ | ५० | ४७ | ६६ | ६८ |
| १ | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ९ | ८ | ८ | १२ |
| इ.पु. | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पु. | पु. | पु. | इ.पु. | इ.पु. |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १९ व २० ऑक्टोबर, २०१९ रोजी तुरळक ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून कमाल तापमानात वाढ संभवते तसेच आकाश मेघाच्छादित राहील. दिनांक १८ ते २४ ऑक्टोबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार ठाणे जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **दाणे भरणे ते पक्व अवस्था** | • गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी.पर्यंत ठेवावी. निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस "वैभव" विळयाच्या सहाय्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे.<br>• वाढते ऊन व आर्द्रतेचे प्रमाण यामुळे वरकस आणि उतार असलेल्या जमिनीतील हळव्या जातीच्या भात पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे पाऊसाचा अंदाज घेवून तयार झालेल्या हळव्या भात पिकाची कापणी उरकून घ्यावी. |
| **आंबा** | **पालवी** | • पाऊसाची उघडीप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना ठिबक पद्धतीने किंवा आळे तयार करून पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये गवताचे १५ सें. मी. जाडीचे किंवा काळ्या प्लास्टिक कापडाचे आच्छादन करावे.<br>• घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये सुरुवातीच्या काळापासून नियमित छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी.<br>• पारंपारिक पध्दतीने लागवड केलेल्या आंबा बागेमध्ये जुन्या अनुत्पादित झाडांची मध्य फांदी छाटणी व इतर मध्यम फांद्यांची विरळणी करावी. यामुळे झाडाला जास्त आणि खोलवर सूर्यप्रकाश उपलब्ध होऊन फळधारणेत वाढ होईल.<br>• वाढत्या तापमानामुळे आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासूनसंरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **काजू** | **पालवी** | • काजू बागांची गवत काढून लवकरात लवकर साफसफाई करावी तसेच वाळलेल्या, मृत आणि अशक्त फांद्या कापून विरळणी करावी. तसेच कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावी.<br>• नवीन लागवड केलेल्या काजू कलमांच्या जोडाच्या खालच्या बाजूने येणारी फुट वेळोवेळी काढून टाकावीत तसेच पाऊसाची उघडीप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने कलमांच्या बुंध्याभोवती २ टक्के फॉलीडॉल पावडर टाकून गवताचे १५ सें. मी. जाडीचे किंवा काळ्या प्लास्टिक कापडाचे आच्छादन करावे<br>• वाढत्या तापमानामुळे काजूच्या नवीन येणाऱ्या पालवीवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • पाऊसाची उघडीप आणि तापमानात वाढ संभवत असल्याने नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी. |

| | | |
|---|---|---|
| **भाजीपाला रोपवाटिका** | **पेरणी** | • रब्बी हंगामासाठी रोपे तयार करण्याकरिता वाफसा स्थितीत जमिनीची मशागत करून ३ मी. लांब X १ मी. रुंद X १५ से.मी. उंचीच्या गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून भाजीपाला बियाण्यांची पेरणी करावी. रोपांची मर रोगापासून संरक्षण करण्याकरीता पेरणीपूर्वी ३ ते ४ दिवस वाफ्यावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची भिजवण करावी तसेच थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे.<br>• भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **कुकुटपालन** | | • पक्ष्यांचे वाढत्या उष्णतेपासून योग्य ते संरक्षण करावे. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोलीयेथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |